EIIRJ Volume–IX Issues– III ISSN–2277- 8721 May – June 2020

# मुंबई शहरातील विलेपार्ले वार्डातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण संपादणूकीचा अभ्यास


संशोधक विद्यार्थी
**श्री. राकेश अशोक रामराजे**
*सहाय्यक प्राध्यापक,*
*पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन फॉर वूमेन*
*एस.एन.डी.टी. महीला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई 20.*

संशोधन मार्गदर्शक
**डॉ. धनंजय एस. वडमारे**
*सहाय्यक प्राध्यापक,*
*वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे*
*अध्यापक महाविद्यालय, जालना*


## 1. प्रस्तावना –

विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. त्याचा सर्वांगीण विकास व्हावा हा मुख्य उद्देश ध्यानात ठेवून सर्व शालेय व सहशालेय उपक्रम आयोजित करणे महत्वपूर्ण ठरते. सहशालेय उपक्रमांमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग असणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे सहशालेय उपक्रमांची बांधणी करतांना विद्यार्थी विकास लक्षात घेतला जातो. विद्यार्थ्यांच्या विकासात शिक्षक हा महत्वाचा दुवा ठरतो. सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून पालक व समाज यांच्याशी बांधीलकी अधिक दृढ होते. बालकांच्या शिक्षणाची खरी सुरुवात माता–पिता व कुटुंबानंतर समाजातच होत असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांला समाजातच कार्यरत व्हावे लागते, त्यामुळे त्याच्या सामाजिक पैलूंचा विकास होणे, सामाजिक स्थितीची त्याला जाणिव असणे महत्वाची ठरते. सहशालेय कार्यक्रमातून सामाजिक स्थितींचे दर्शन होते. विद्यार्थी कुटुंबात, समाजात, शाळेत वावरत असतांना विभिन्न प्रकारच्या स्तरावर आपल्या विचारांची आदान–प्रदान करित असतो. विद्यार्थ्यांच्या विकासावर कुटुंबाचा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक शैक्षणिक स्तर व परिस्थितीचा प्रत्यक्षपणे परिणाम होत असतो. कुटुंबातील मिळणारे प्रोत्साहन त्यास दिशा देण्याचे मोलाचे कार्य करत असते व त्याची गुणवत्ता याच बाबींवर निश्चित होत असते. विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करणे, त्यास अध्ययनास प्रवृत्त करणे यासाठी कुटुंबाची स्थिती, समाज व शाळा हे सर्व महत्वाच्या भूमिका बजावत असतात. कुटुंब व्यापक समाजरचनेचा घटक आहे.

समाजातील इतर आर्थिक, धार्मिक, राजकिय, सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी विद्यार्थी संबंधित असतो. कुटुंबाच्या परिस्थितीचा बाल्याच्या शिक्षणावर प्रभाव दिसून येतो. व्यक्ती आणि समाज यांमधील सांस्कृतिक पार्श्वभूमीवर परस्पर संबंधांचा पध्दतशीर अभ्यास म्हणजे समाजशास्त्र. या समाजशास्त्रात व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या बाबींचा अभ्यास–रितिरिवाज, कुटुंबसंस्था, धर्म, सामाजिक संस्था, जातिसंस्था–जातिभेद इ. घटकांचा अभ्यास होय. बालकाच्या व्यक्तिमत्वावर परिणाम करणारे घटक म्हणजे शरीरयष्टी, जैवरसायने, विविध क्षमता, सामाजिक प्रेरणा, कुटुंब, कुटुंबाची आर्थिक स्थिती, सामाजिक परिसर, शाळा व त्यात होणाऱ्या विविध आंतरक्रिया हे होय. बालकांच्या विकासात कुटुंब, शाळा, सामाजिक परिसर महत्वाची भूमिका बजावतात, म्हणून शाळेतच बालकाच्या भावना अविष्कारास संधी देणे व वळण लावणे अपेक्षित आहे. शाळांमधून शिक्षणाची भावना, कृती, प्रेरणा यांना योग्य मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थी आपले आचार, विचार, वर्तन व कृती याबाबत आपल्या कुटुंबामध्ये प्रदर्शित करित असतो. कुटुंब तसेच समाज यांचेकडून मिळणाऱ्या प्रेरणेवर त्याचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असते.

2. **संशोधनाची गरज –**

शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले गेले आहे. शिक्षणामुळे समाजात शांतीयुक्त क्रांती निर्माण होते. आजच्या प्रचलित शिक्षण पध्दतीत बदल घडला पाहिजे, याविषयी मतभेद दिसून येतात. परंतु परिवर्तन घडत असतांना भारताचा धार्मिक व सांस्कृतिक वारसा, इतिहास, ज्ञान – परंपरा यांच्या बरोबरीनेच आधुनिक जगातील वैज्ञानिक प्रगती आणि भविष्यकाळाची आव्हाने यांचाही समग्रतेने विचार होण्याची आवश्यकता आहे. शालेय शिक्षण, अभ्यासक्रम, वातावरण, वयपरत्वे मिळणारे घटनात्मक अधिकार या साऱ्या गोष्टी शालेय विद्यार्थीदशेत घडत असतात. ''शिक्षणाचा स्तर सर्व विद्यार्थ्यांसाठी समान व सारखा असणे गरजेचे आहे.'' शिक्षणहक्क कायद्यानुसार प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मुक्त व सक्तीचे असून सुध्दा आज प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होतांना दिसून येते. वरिल सर्व कुटुंबाच्या स्थितीचे प्रथमदर्शी सारासार विचार केल्यास आपणास असे दिसून येते की प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा,' सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक शैक्षणिक स्तर हा गुणवत्ता वाढीसाठी महत्वपूर्ण आहे.

''आपला वर्ग हा समाजाची छोटी प्रतिकृती असते. त्यात विविध कुटुंबातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक शैक्षणिक स्तरातील विद्यार्थी असतात.'' शाळेमध्ये विद्यार्थी अध्ययन करित असतांना त्यांचा वर्ग त्यांची शाळा हे आपले विश्‍व मानत असतात. त्यामध्ये मिळणारे ज्ञान हेच खरे प्रमाण आहे अशी त्यांची धारणा असते. पण, वर्गामध्ये/शाळेमध्ये वरवर पाहता एकाच गटाचा विचार करता विद्यार्थ्यांत अनेक वृत्ती दिसून येतात. त्यांचा अभ्यास करण्यासाठी गुणवत्तापूर्वक चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांस पुरक ज्ञान देऊन त्याच्या गुणवत्तेवर कोणता परिणाम होतो. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

3. **संशोधनाचे महत्व –**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता संपादनास कोणते घटक परिणाम करतात व कशा प्रकारे त्यास कोणते मार्गदर्शन केले पाहीजे या दृष्टिकोनातून संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

संशोधक बी.एड् विद्यार्थ्यांचे सराव पाठ बघण्यास महानगरपालिकेच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक तसेच अनुदानित, विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दु शाळांवर जात असे, त्यावेळी विद्यार्थी शाळेत येतांना त्यांचे परिसर, आर्थिक परिस्थती, धार्मिक परिस्थिती तसेच परिवाराची सांस्कृतिक स्थिती, विद्यार्थ्यांच्या राहणीमानावर, गणवेशावर, तसेच त्याची आपले विचार मांडण्यांची शैली, संस्कृतीप्रमाणे झालेले सोपस्कर, त्यावर धार्मिकतेचा पगडा, राहणीमानामध्ये आर्थिकतेच्या बाबींतून दिसणारे बदल यातून गुणवत्तेवर होणारा परिणाम नजरेस पडत होता. त्यांच्या अध्ययन–अध्यापनावर विशेषतः शाळेतील ज्ञानावर या सर्व बाबींतून प्रभाव निदर्शनास येत होता.

त्यामुळे संशोधकाने विद्यार्थ्यांच्या विकासावर परिणाम करणारे घटक व त्यांचा गुणवत्तेचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टिने तसेच सर्व बाबींचा चिकित्सक अभ्यास झाला तर त्याला कुटुंबाच्या परिस्थीतीनूसार त्याला कोणत्या परिस्थितीतून अध्यापनात गुणवत्ता टिकवून ठेवणे किंवा मिळविणे यावर प्रकाश पडणे या सर्व बाबींतून संशोधकाने महत्व लक्षात घेऊन सदरचे संशोधन कार्य करण्याचे योजिले आहे.

4. **संशोधनाचे समस्या विधान –**

मुंबई शहरातील विलेपार्ले वार्डातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण संपादणूकीचा अभ्यास.

5. **समस्या विधानातील महत्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या –**

**प्राथमिक शाळा** – महाराष्ट्र शासनांतर्गत विभिन्न माध्यमातून इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत (वयोगट 6 ते 14 वर्ष) शिक्षण देणारा स्तर.

**विद्यार्थी** – विभिन्न माध्यमातून विविध विषयांचे अध्ययनाचे कार्य करणारे घटक.

**गुणवत्ता** – वेळ व मूल्यमापन यांवर लक्ष ठेऊन काढलेला निष्कर्ष.

**संपादणूक** – क्षमतांचा विकास होणे व त्याचा प्रत्यक्षात वापर.

6. **संशोधनाची गृहितके –**

1. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कौंटुबिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तरावर समस्या आहेत.
2. प्राथमिक शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाकरीता सोयी सुविधांचा अभाव आहे.
3. विद्यार्थ्यांमध्ये बुध्यांक सर्वसाधारण असतो.
4. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक मुलभूत गरजा पूर्ण करण्याच्या विवंचनेत असल्यामुळे शिक्षणाकडे दुर्लेक्षित व उदासीन असतात.

7. **संशोधनाची उद्दिष्टे –**

1. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या,' कुटुंबाचा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तर यांचा स्तराचा अभ्यास करणे.
2. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा अभ्यास करणे.
3. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण संपादणूकीचा अभ्यास करणे.

8. **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –**

**संशोधनाची व्याप्ती** – मुंबई पश्चिम उपनगरामधील विलेपार्ले वार्डातील प्राथमिक शाळेतील 1 ली ते 5 चे वर्गांतील विद्यार्थ्यांच्या,' कुटुंब, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तरांचा अभ्यास करणे पुरतेच व्याप्त आहे.

**संशोधनाची मर्यादा** – संबंधीत संशोधन मुंबई पश्चिम उपनगरामधील विलेपार्ले वार्डातील इ. 1 ली ते 5 वी पर्यंतचे शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा वैयक्तिक,' कुटुंबाचा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तर व गुणवत्तापूर्ण संपादणूक यापुरतेच मर्यादीत आहे.

9. **संशोधनाची पध्दती** – संबंधित संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड केली आहे.

10. **संशोधनाची साधने** – प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

11. न्यादर्श –

मुंबई शहरामधील विलेपार्ले वार्डात 3 मराठी, 2 हिंदी माध्यमाच्या, 1 उर्दु अशा एकूण 6 महानगर पालिकेच्या शाळा, 1 अनुदानित प्राथमिक मराठी माध्यमाची शाळा, 1 विनाअनुदानित मराठी माध्यम व 1 विनाअनुदानित हिंदी माध्यमाची प्राथमिक शाळा, 1 कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा असे एकूण 10 प्राथमिक शाळेत अध्ययन करणारे 1250 विद्यार्थी आहेत.

न्यादर्श निवड –

सदर संशोधनासाठी संशोधकाने संशोधनासाठी समानता व समता एकत्रित न्यादर्श निवडीनूसार संशोधनासाठी सर्व प्रकारांच्या अनुदान प्रकारातील एकूण 10 शाळांपैकी इ. 1 ली ते 5 वी चे वर्ग असणाऱ्या शाळांपैकी समानता व समता एकत्रित न्यादर्श निवडीने 5 शाळांची निवड केलेली आहे. सदरहू न्यादर्श पध्दतीने त्यात अध्ययन करणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी 20 टक्के म्हणजेच 250 विद्यार्थी निवडण्यात आले आहेत.

12. सांख्यिकीय परिणाम –

उपलब्ध माहितीचे प्रस्तुतीकरण व केलेले सर्वेक्षण प्रस्तुत करण्याठी तसेच संख्याशास्त्रीय माहितींच्या वर्णनात्मक नोंदी करण्यासाठी पुढील सांख्यिकी तंत्राचा वापर केला आहे.

केंद्रीय प्रवृत्तीचे परिमाणे – शेकडा टक्केवारी

**अनुमानात्मक विश्लेषण** – प्रस्तुत तुलनात्मक स्थितीतून शेकडा टक्केवारी यांच्या माध्यमातून अनुमानात्मक विश्लेषणाचा वापर केलेला आहे.

13. संशोधनाची कार्यवाही –

संबंधित प्राथमिक शाळेला भेट देवून त्यांची अनुमती घेण्यात आली. प्रश्नावली निर्मिती (विद्यार्थी प्रश्नावली) तयार करण्यात आली. तज्ज्ञांकडून प्रश्नावली तपासणी व सुधारणा केली. कार्यक्रमाची रचना व नियोजनानुसार प्रश्नावली भरुन घेतली. प्रश्नावलीनुसार संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले. निष्कर्ष काढण्यात आले.

14. संख्याशास्त्रीय विश्लेषण –

विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रतिसादात्मक प्रश्नास विद्यार्थ्यांनी खालील कोष्टकामध्ये दर्शविल्याप्रमाणे शेकडा टक्केवारी प्रमाणे प्रतिसाद नोंदविला आहे.

**कोष्टक क्र. 1**

**प्रतिसादात्मक प्रश्नास विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाची टक्केवारी**

| अ. क्र. | प्रतिसादात्मक प्रश्न | पूर्णपणे सहमत | सहमत | असहम | पूर्णपणे असहमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कुटुंब प्रमुख व घरातील सदस्य आमच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणासाठी प्रेरणा देतात ? | 62 | 17 | 11 | 10 |
| 2 | कुटुंबातील सर्व सदस्य शिक्षित आहेत परंतु त्यांच्याकडे वेळ नाही म्हणून शिकवणी / टयुशन लावले आहे ? | 67 | 13 | 11 | 8 |
| 3 | तुम्ही नियमित शाळेत जातेवेळी नियमित आंघोळ, स्वच्छ गणवेश, टापटीपपणा, शालेय बॅग, डबा, पाण्याची बाटली, इ. विषयी वैयक्तिक लक्ष दिले जाते ? | 74 | 10 | 8 | 8 |


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | तुमची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात? | 75 | 9 | 8 | 8 |
| 5 | तुमची प्रगतीपुस्तिका कुटुंबातील सदस्य पाहुन खुप आनंदी होतात ? | 74 | 9 | 9 | 8 |
| 6 | कुटुंबातील सदस्य विविध स्पर्धा, परीक्षा, खेळ, चित्रकला, हस्तकला इ. विषयी जागृत आहेत व ते मला त्या करिता संधी देतात ? | 69 | 16 | 8 | 7 |
| 7 | तुमच्या घराजवळील परिसरामध्ये सर्व धर्माच्या समाजाची घरे आहेत ? | 68 | 13 | 11 | 8 |
| 8 | आमच्या परिसरात आमच्या विशिष्ट धर्माचेच सण/उत्सव साजरे होतात ? | 11 | 12 | 14 | 64 |
| 9 | माझ्या कुटुंबावर पारंपारिक व्यवसायाचा प्रचंड पगडा आहे, त्यामुळे कुटुंबात व समाजात आमचा व्यवसाय करतो ? | 9 | 12 | 10 | 69 |
| 10 | माझ्या वर्गातील सर्व समाजातील धर्माच्या विद्यार्थ्यांशी माझी मैत्री आहे ? | 60 | 22 | 9 | 9 |
| 11 | शाळेमध्ये राष्ट्रीय सण/उत्सव व इतर उत्सवांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सामावून सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात ? | 66 | 13 | 12 | 9 |
| 12 | शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मूल्ये माहित आहेत ? | 62 | 15 | 12 | 11 |
| 13 | कुटुंब, समाज व शाळेमधून धर्म आचरण व वर्तन करण्याचे अनौपचारिक शिक्षण प्राप्त होते ? | 66 | 13 | 12 | 9 |
| 14 | माझे कुटुंब उच्च मध्यम/मध्यम (आर्थिक सक्षम) आहे ? | 61 | 16 | 12 | 11 |
| 15 | शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो ? | 48 | 7 | 22 | 23 |
| 16 | वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाके आहेत ? | 46 | 13 | 21 | 20 |
| 17 | काही शिक्षक अध्यापनावर दुर्लक्ष करतात ? | 9 | 9 | 11 | 71 |
| 18 | शाळेमधील व वर्गांमधील मी व बहुसंख्य विद्यार्थी सामान्य कुटुंबातील आहे ? | 72 | 14 | 7 | 7 |
| 19 | विद्यार्थी, विद्यार्थीना स्वतंत्र स्वच्छतागृह/प्रसाधनगृह स्वच्छ हवायुक्त पाण्यासह उपलब्ध आहे ? | 76 | 9 | 8 | 7 |
| 20 | माझी शाळा म्हणून मला शाळेचे आकर्षण आहे ? | 81 | 6 | 6 | 6 |
| 21 | पालकांना आमच्या भवितव्याची चिंता वाटते ? | 58 | 17 | 14 | 11 |
| 22 | भाषा अध्ययन करतांना विज्ञानाचा आधार घेतला जात नाही ? | 13 | 14 | 24 | 49 |
| 23 | शास्त्राचा अभ्यास करतांना मनशक्ती व आत्मविश्वास असणे गरजेचे आहे ? | 67 | 13 | 11 | 8 |
| 24 | तुमचे शिक्षक जीवनाची अनुभूती देणारी उदाहरणे देतात ? | 66 | 13 | 11 | 9 |
| 25 | शालेय जीवनात शाश्वत, वास्तव व ज्ञानाचे स्मरण, आनंद असावा, भय नसावे ? | 81 | 6 | 6 | 6 |

14.1 अर्थनिर्वचन –

**प्रश्न क्र 1** : कुटुंब प्रमुख व घरातील सदस्य आमच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणासाठी प्रेरणा देतात ?

आलेख क्र. 1

कुटुंब प्रमुख व घरातील सदस्य आमच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणासाठी प्रेरणा देतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, कुटुंब प्रमुख व घरातील सदस्य आमच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणासाठी प्रेरणा देतात. या विधानास 62 टक्के पूर्णपणे सहमती, 17 टक्के सहमती, 11 टक्के असहमती व 10 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र 2** : कुटुंबातील सर्व सदस्य शिक्षित आहेत परंतु त्यांच्याकडे वेळ नाही म्हणून शिकवणी/टयुशन लावले आहे ?

आलेख क्र. 2

कुटुंबातील सर्व सदस्य शिक्षित आहेत परंतु त्यांच्याकडे वेळ नाही म्हणून शिकवणी/टयुशन लावले आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, कुटुंबातील सर्व सदस्य शिक्षित आहेत परंतु त्यांच्याकडे वेळ नाही म्हणून शिकवणी/टयुशन लावले आहे. या विधानास 68 टक्के पूर्णपणे सहमती, 13 टक्के सहमती, 11 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 3** : तुम्ही नियमित शाळेत जातेवेळी नियमित आंघोळ, स्वच्छ गणवेश, टापटीपपणा, शालेय बॅग, डबा, पाण्याची बाटली, इ. विषयी वैयक्तिक लक्ष दिले जाते ?

**आलेख क्र. 3**

**तुम्ही नियमित शाळेत जातेवेळी नियमित आंघोळ, स्वच्छ गणवेश, टापटीपपणा, शालेय बॅग, डबा, पाण्याची बाटली, इ. विषयी वैयक्तिक लक्ष दिले जाते, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





अर्थनिर्वचन : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, तुम्ही नियमित शाळेत जातेवेळी नियमित आंघोळ, स्वच्छ गणवेश, टापटीपपणा, शालेय बॅग, डबा, पाण्याची बाटली, इ. विषयी वैयक्तिक लक्ष दिले जाते. या विधानास 74 टक्के पूर्णपणे सहमती, 10 टक्के सहमती, 8 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 4** : तुमची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात ?

**आलेख क्र. 4**

**तुमची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, तुमची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात. या विधानास 75 टक्के पूर्णपणे सहमती, 9 टक्के सहमती, 8 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 5** : तुमची प्रगतीपुस्तिका कुटुंबातील सदस्य पाहुन खुप आनंदी होतात ?

आलेख क्र. 5

**तुमची प्रगतीपुस्तिका कुटुंबातील सदस्य पाहुन खुप आनंदी होतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, तुमची प्रगतीपुस्तिका कुटुंबातील सदस्य पाहुन खुप आनंदी होतात. या विधानास 74 टक्के पूर्णपणे सहमती, 9 टक्के सहमती, 9 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 6** : कुटुंबातील सदस्य विविध स्पर्धा, परीक्षा, खेळ, चित्रकला, हस्तकला इ. विषयी जागृत आहेत व ते मला त्या करिता संधी देतात ?

आलेख क्र. 6

**कुटुंबातील सदस्य विविध स्पर्धा, परीक्षा, खेळ, चित्रकला, हस्तकला इ. विषयी जागृत आहेत व ते मला त्या करिता संधी देतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, कुटुंबातील सदस्य विविध स्पर्धा परीक्षा, खेळ, चित्रकला, हस्तकला इ. विषयी जागृत आहेत व ते मला त्या करिता संधी देतात. या विधानास 69 टक्के पूर्णपणे सहमती, 16 टक्के सहमती, 8 टक्के असहमती व 7 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 7 :** तुमच्या घराजवळील परिसरामध्ये सर्व धर्माच्या समाजाची घरे आहेत ?

**आलेख क्र. 7**

**तुमच्या घराजवळील परिसरामध्ये सर्व धर्माच्या समाजाची घरे आहेत, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन :** संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, तूमच्या घराजवळील परिसरामध्ये सर्व धर्माच्या समाजाची घरे आहेत. या विधानास 68 टक्के पूर्णपणे सहमती, 13 टक्के सहमती, 11 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 8 :** आमच्या परिसरात आमच्या विशिष्ट धर्माचेच सण/उत्सव साजरे होतात ?

**आलेख क्र. 8**

**आमच्या परिसरात आमच्या विशिष्ट धर्माचेच सण/उत्सव साजरे होतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन :** संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, आमच्या परिसरात आमच्या विशिष्ट धर्माचेच सण/उत्सव साजरे होतात. या विधानास 11 टक्के पूर्णपणे सहमती, 12 टक्के सहमती, 14 टक्के असहमती व 63 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 9** : माझ्या कुटुंबावर पारंपारिक व्यवसायाचा प्रचंड पगडा आहे. त्यामुळे कुटुंबात व समाजात आमचा व्यवसाय करतो ?

आलेख क्र. 9

**माझ्या कुटुंबावर पारंपारिक व्यवसायाचा प्रचंड पगडा आहे. त्यामुळे कुटुंबात व समाजात आमचा व्यवसाय करतो, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, माझ्या कुटुंबावर पारंपारिक व्यवसायाचा प्रचंड पगडा आहे. त्यामुळे कुटुंबात व समाजात आमचा व्यवसाय करतो. या विधानास 9 टक्के पूर्णपणे सहमती, 12 टक्के सहमती, 10 टक्के असहमती व 69 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 10** : माझ्या वर्गातील सर्व समाजातील धर्माच्या विद्यार्थ्यांशी माझी मैत्री आहे ?

आलेख क्र. 10

**माझ्या वर्गातील सर्व समाजातील धर्माच्या विद्यार्थ्यांशी माझी मैत्री आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, माझ्या वर्गातील सर्व समाजातील धर्माच्या विद्यार्थ्यांशी माझी मैत्री आहे. या विधानास 61 टक्के पूर्णपणे सहमती, 22 टक्के सहमती, 9 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 11** : शाळेमध्ये राष्ट्रीय सण/उत्सव व इतर उत्सवांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सामावून सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात ?

आलेख क्र. 11

**शाळेमध्ये राष्ट्रीय सण/उत्सव व इतर उत्सवांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सामावून सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, शाळेमध्ये राष्ट्रीय सण/उत्सव व इतर उत्सवांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सामावून सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. या विधानास 66 टक्के पूर्णपणे सहमती, 13 टक्के सहमती, 12 टक्के असहमती व 9 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 12** : शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मूल्ये माहित आहेत ?

आलेख क्र. 12

**शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मूल्ये माहित आहेत, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मूल्ये माहित आहेत. या विधानास 62 टक्के पूर्णपणे सहमती, 15 टक्के सहमती, 12 टक्के असहमती व 11 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 13** : कुटुंब, समाज व शाळेमधून धर्म आचरण व वर्तन करण्याचे अनौपचारिक शिक्षण प्राप्त होते ?

**आलेख क्र. 13**

**कुटुंब, समाज व शाळेमधून धर्म आचरण व वर्तन करण्याचे अनौपचारिक शिक्षण प्राप्त होते, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, कुटुंब, समाज व शाळेमधून धर्म आचरण व वर्तन करण्याचे अनौपचारिक शिक्षण प्राप्त होते. या विधानास 66 टक्के पूर्णपणे सहमती, 13 टक्के सहमती, 12 टक्के असहमती व 9 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 14** : माझे कुटुंब उच्च मध्यम/मध्यम (आर्थिक सक्षम) आहे ?

**आलेख क्र. 14**

**माझे कुटुंब उच्च मध्यम/मध्यम (आर्थिक सक्षम) आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, माझे कुटुंब उच्च मध्यम/मध्यम (आर्थिक सक्षम) आहे. या विधानास 61 टक्के पूर्णपणे सहमती, 16 टक्के सहमती, 12 टक्के असहमती व 11 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

प्रश्न क्र. 15 : शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो ?

आलेख क्र. 15

शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. या विधानास 48 टक्के पूर्णपणे सहमती, 7 टक्के सहमती, 22 टक्के असहमती व 23 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

प्रश्न क्र. 16 : वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाके आहेत ?

आलेख क्र. 16

वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाके आहेत, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाके आहेत. या विधानास 46 टक्के पूर्णपणे सहमती, 13 टक्के सहमती, 21 टक्के असहमती व 20 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 17** : काही शिक्षक अध्यापनावर दुर्लक्ष करतात ?

**आलेख क्र. 17**

**काही शिक्षक अध्यापनावर दुर्लक्ष करतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, काही शिक्षक अध्यापनावर दुर्लक्ष करतात. या विधानास 9 टक्के पूर्णपणे सहमती, 9 टक्के सहमती, 11 टक्के असहमती व 71 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 18** : शाळेमधील व वर्गामधील मी व बहुसंख्य विद्यार्थी सामान्य कुटुंबातील आहे ?

**आलेख क्र. 18**

**शाळेमधील व वर्गामधील मी व बहुसंख्य विद्यार्थी सामान्य कुटुंबातील आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, शाळेमधील व वर्गामधील मी व बहुसंख्य विद्यार्थी सामान्य कुटुंबातील आहे. या विधानास 72 टक्के पूर्णपणे सहमती, 14 टक्के सहमती, 7 टक्के असहमती व 7 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 19** : विद्यार्थी, विद्यार्थींना स्वतंत्र स्वच्छतागृह/प्रसाधनगृह स्वच्छ हवायुक्त पाण्यासह उपलब्ध आहे ?

**आलेख क्र. 19**

**विद्यार्थी, विद्यार्थींना स्वतंत्र स्वच्छतागृह/प्रसाधनगृह स्वच्छ हवायुक्त पाण्यासह उपलब्ध आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, विद्यार्थी, विद्यार्थींना स्वतंत्र स्वच्छतागृह/प्रसाधनगृह स्वच्छ हवायुक्त पाण्यासह उपलब्ध आहे. या विधानास 76 टक्के पूर्णपणे सहमती, 9 टक्के सहमती, 8 टक्के असहमती व 7 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 20** : माझी शाळा म्हणून मला शाळेचे आकर्षण आहे ?

**आलेख क्र. 20**

**माझी शाळा म्हणून मला शाळेचे आकर्षण आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**




**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या विद्यार्थ्यांनी, माझी शाळा म्हणून मला शाळेचे आकर्षण आहे. या विधानास 81 टक्के पूर्णपणे सहमती, 6 टक्के सहमती, 7 टक्के असहमती व 6 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

15. निष्कर्ष –

1. बहुतांशी कुटुंब प्रमुख व घरातील सदस्य विद्यार्थ्यांच्या/त्यांच्या पाल्याच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणासाठी प्रेरणा देतात परंतु सर्वांनीच त्यासाठी प्रेरणा देणे गरजेचे आहे.
2. कुटुंबातील सर्व सदस्य शिक्षित आहेत परंतु त्यांच्याकडे वेळ नाही म्हणून शिकवणी/टयुशन लावले आहे. परंतु पाल्याच्या शिक्षणासाठी शिकवणी/टयुशन हा पर्याय योग्य नाही. सर्वच पालकांनी पाल्याच्या अध्यापनावर लक्ष देणे गरजेचे आहे.
3. विद्यार्थ्यांकडे नियमित शाळेत जातेवेळी नियमित आंघोळ, स्वच्छ गणवेश, टापटीपपणा, शालेय बॅग, डबा, पाण्याची बाटली, इ. विषयी वैयक्तिक लक्ष दिले जाते. परंतु सर्वच विद्यार्थ्यांकडे त्यांच्या भौतिक सुविधांसाठी नियमित लक्ष देणे गरजेचे आहे.
4. शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात, परंतु विद्यार्थ्यांची प्रगती जाणून घेण्यासाठी कुटुंबातील व्यक्तींनी शाळेस भेट दिली पाहीजे.
5. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या कोणत्याही क्षेत्रातील यशाचे कौतुक करणे ही पालकांची आद्य भुमिका आहे. त्यांच्या मिळालेल्या प्रगती पुस्तिकांनुसार त्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.
6. शालेय स्तरावरील सर्व विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या कौशल्य गुणांवर भर देणे आवश्यक आहे.
7. विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्म समभाव हे मूल्य रुजावे या करिता विद्यार्थ्यांच्या घराजवळील परिसरामध्ये विविध धर्मातील समाजाची घरे असणे आवश्यक आहे. विविध धर्मांच्या संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना झाल्यास भविष्यात जातीधर्मांच्या अदृष्य भिंती नष्ट होण्यासाठी नक्कीच मदत होईल.
8. समाजातील बहुतांश लोकांचा विविध सण/उत्सव साजरा करण्याचा सकारात्मक दृष्टिकोण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लावतो.
9. शालेय स्तरावर विद्यार्थ्याच्या कला गुण व कौशल्यांवर भर देऊन विद्यार्थ्यांची आवड कोणत्या क्षेत्राकडे आहे, त्यानुसार विद्यार्थ्याला योग्य मार्गदर्शन करुन प्रोत्साहीत करण्याकडे अनेक कुटुंबाचा कल आहे. घराचा पारंपारिक व्यवसाय पुढे नेण्यापेक्षा विद्यार्थ्याने त्याची आवड जपणे हे कुटुंबासाठी प्राधान्यक्रमाचे बनलेले आहे आणि ही बाब विद्यार्थ्याच्या पोषक वाढीसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.
10. मैत्री करतांना विद्यार्थ्यांनी कोणत्याही धर्माचा पगडा स्वतःवर निर्माण करुन घेतलेला नाही. व्यक्तीने मैत्री कोणाशी करावे याचे व्यक्तिस्वातंत्र्य प्रत्येक विद्यार्थ्यालाच नव्हे तर समाजातील प्रत्येक घटकाला आहे.
11. शाळा हे एक असे माध्यम आहे जेथे विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे वाढीस लागतो. शालेय स्तरांवर अशा कार्यक्रमांचे आयोजन होणे हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक ठरेल.
12. शाळा हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात महत्वाची भूमिका बजावत असते. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्य रुजविणे हे शाळेचे महत्वाचे कार्य आहे. हे मूल्य जास्तीत जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये रुजेल यासाठी शाळांनी जाणीव पुर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे.
13. कुटुंब, समाज आणि शाळा हे विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे मुख्य केंद्र आहे. त्यामुळे या ठिकाणांवरुन विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षण तर मिळतेच पण त्या सोबतच अनौपचारिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

14. कुटुंबातील सदस्यांची शैक्षणिक गुणवत्ता कुटुंबाला आर्थिक दृष्टया सक्षम करत असते म्हणूनच कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले गेले पाहीजेत. शिक्षणामुळे बऱ्याचशा कुटुंबांमध्ये आर्थिक सक्षमता दिसून येते.
15. शासनाची विभिन्न अनुदाने प्राप्त शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो तर अनुदाने प्राप्त नसलेल्या शाळांमध्ये पोषण आहार दिला जात नाही. विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देऊन त्यांचा शारिरीक विकास साधता येईल.
16. विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणे ही सर्वस्वी शाळेची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी तसेच विद्यार्थी संख्या वाढीसाठी शाळेमध्ये भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.
17. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सतत प्रयत्न करणे हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. देशाचा आदर्श नागरिक घडविण्याची महत्वाची जबाबदारी शिक्षकांची असते. या कार्यात झालेला ढिसाळपणा देशाच्या विकासासाठी घातक ठरु शकतो.
18. कुटुंबाच्या आर्थिक सुबत्तेचा कोणताही परिणाम विद्यार्थ्यांच्या बौध्दिक कौशल्यांवर होत नाही. मुळातच कुशाग्र बुध्दिमत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत आपल्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्नशील असावे.
19. शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये येणारा महत्वाचा घटक म्हणजे स्वच्छतागृह/प्रसाधनगृह यांची स्वच्छता तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय विद्यार्थ्यांच्या या गरजा पूर्ण होणे आवश्यक असते. यातूनच विद्यार्थ्यांचे आरोग्य अबाधित राहण्यास मदत होईल.
20. शाळा हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे केंद्रस्थान आहे त्यामुळेच बहुतांश विद्यार्थ्यांना कुटुंबाइतकीच शाळा प्रिय आहे. शाळेतील मित्र परिवार व शिक्षक हे विद्यार्थ्याला घडविण्यात महत्वाची भुमिका पार पाडत असतात.

## 16. शिफारशी –

1. कुटुंबातील सदस्यांनी पाल्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी त्यांना सतत प्रेरणा देणे, शिक्षकांच्या भेटी घेऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. त्यांच्या शैक्षणिक गरजांचा पुर्ततेसाठी प्रयत्नशील असावे.
2. पाल्यांमध्ये समाजशीलता, स्नेहभाव, राष्ट्रीय एकात्मता यांसारखी मूल्ये रुजविणेसाठी कुटुंबातील अथवा समाजातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे.
3. शाळा व कुटुंब यांनी सर्वधर्म समभाव तसेच सर्व धर्मांचा आदर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करावे.
4. शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शारिरीक, मानसिक, भावनिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी शिक्षकांनी विशेष लक्ष द्यावे.
5. शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागणे, तसेच त्यांचा व्यक्तिमत्व विकास वृध्दिंगत होईल याकरिता विशेष उपक्रम राबवावेत.

17. समारोप –

आपली लोकशाही न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या चार स्तंभावर उभी आहे. व्यक्तिप्रतिष्ठा आणि धर्मनिरपेक्षता या दोन मूल्यांना देखील आपल्या राज्यघटनेत अधिक महत्व आहे. लोकशाही मूल्ये बालकांच्या मनात रुजविण्याचे काम आपल्या शिक्षण प्रणालीतून जाणीवपूर्वक करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम वयामध्ये परिवाराची भुमिका व त्यास प्राप्त होणाऱ्या मुलभूत सुविधा त्यावर त्याचा सर्वांगीण विकास होत असतो. त्याच्या भौतिक सुविधा पुर्ण करण्याची जबाबदारी मुख्यत्वे त्याच्या परिवाराची असते, आणि परिवाराच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परिणाम त्याच्या अध्ययन अध्यापनावरील गुणवत्तेवर होत असतो. त्याच्या गुणवत्तेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला तर त्याच्या सर्वांगीण विकासासाठी व भावी जीवनाच्या जडणघडणीवर सकारात्मक परिणाम होण्यास मदत होईल.

18. संदर्भ –


1. गोगटे, श्री. व. (1986). *शिक्षणातील मानसशास्त्र,* पुणे : श्री विद्या प्रकाशन Pg. 423
2. मानव संसाधन विकास मंत्रालय, (1986). *राष्ट्रीय शिक्षा नीति*, 1986, भारत सरकार : शिक्षा विभाग, दिल्ली Pg. 4 retrieved from http://www.ncert.nic.in/oth_anoun/national_policy_hindi.pdf dated on 02/02/2018
3. अकोलकर, ग. वि. (1990). *शैक्षणिक तत्वज्ञानाची रुपरेषा*, पुणे : श्री विद्या प्रकाशन Pg. 174
4. कुलकर्णी, पी. के. (2013). *मानवी हक्क आणि सामाजिक न्याय,* पुणे : डायमंड प्रकाशन. Pg. 46
5. खाडे, सो. गो. (2004). आनंददायी शालेय शिक्षण, *शिक्षण संक्रमण,* जुलै–2004, पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
6. राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद (2016), *Concepts and Definitions*, राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद New Delhi retrieved from www.ncert.nic.in/programmes/education_survey/msise/Concepts%20and%20Definitions%20%20Alphabatical.pdf dated on 03/02/2019
7. दूधे, मा. रा. (2003). समाज आणि शाळा पुरक नाते, *शिक्षण संक्रमण,* जानेवारी–2003, पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
8. वाघमारे, ज., (2009). *लोकशाही आणि शिक्षण,* पुणे : पद्मगंधा प्रकाशन Pg. 23
9. कुलकर्णी, पी. के. (2014). *प्रगत समाजशास्त्रीय सिध्दांत,* नागपूर : मंगेश प्रकाशन. Pg. 18
10. मेहेंदळे, य. श्री. (1973).*समाजशास्त्राची मूलतत्वे,* पुणे : मेंहेंदळे प्रकाशन Pg. 221
11. मुळे, रा. शं., आणि उमाठे, वि. तु. (1998). *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे,* औरंगाबाद : विद्या प्रकाशन. Pg. 64
12. नवले, एस. जी. (2005). शाळा एक संस्कार केंद्र, *जीवन शिक्षण,* जुलै–2005, पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. Pg. 27
13. देसले, एस्. वाय्., आणि भदाणे, एम्. ए. (2009). *शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र,* नाशिक : रेशमाई प्रकाशन. Pg. 113
14. पिचड, न., आणि बरकले, रा. (2005). *अध्यापनशास्त्रीय विश्लेषण,* नाशिक : इनसाईट प्रकाशन. Pg. 76